**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४**

क्र.कोविमं/ उच्च माध्य,/ 3065

दिनांक :२१ /०१/ २०२०

**प्रति,**

प्राचार्य,

सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,

जिल्हा-सातारा/सांगली/कोल्हापूर

विषय - उच्च माध्यमिक (इ.१२वी) फेब्रुवारी-मार्च २०२० परीक्षा प्रवेशपत्रांबाबत ( Hall Ticket )

उपरोक्त विषयाच्या अनषंगाने आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक (इ.१२वी) फेब्रुवारी-मार्च २०२० च्या परीक्षेस प्रविष्ठ होणा-या सर्व विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे ( Hall Ticket ) ऑनलाईन पध्दतीने मंगळवार दि.२१/०१/२०२० रोजी उपलब्ध होणार असून , त्यासंदर्भात कनिष्ठ महाविद्यालयानी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

१) फेबुवारी-मार्च २०२० इयत्ता १२ वी परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदनपत्र सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे (Hall Ticket **मंगळवार दिनांक २१.०१.२०२०** पासून मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. प्रवेशपत्रे college login मध्ये download करावयाची आहेत

२) फेबुवारी-मार्च २०२० इयत्ता १२ वी परीक्षेसाठी ऑनलाईनआवेदनपत्र सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे (Hall Ticket ) ऑनलाईन प्रिंट काढून त्यावर प्राचार्यांनी शिक्का मारुन सही करावयाची आहे.त्यानंतर प्रवेशपत्रे विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.

३) प्रवेशपत्राची (Hall Ticket ) ऑनलाईन प्रिंटींग करताना प्रिंट साठी विद्यार्थ्यांकडून कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये.

४) प्रवेशपत्रामध्ये (Hall Ticket ) विषय व विषयाचे माध्यम इ. मध्ये दुरुस्त्या असतील तर कनिष्ठ महाविद्यालयानी तातडीने या कार्यालयात येवून दुरुस्ती करुन घ्यावयाची आहे. जेणेकरुन परीक्षा केंद्रावर वेळेत प्रश्नपत्रिका पुरविणे शक्य होईल.

५) प्रवेशपत्रामध्ये (Hall Ticket ) मध्ये विद्यार्थ्यांच्या नावांत,जन्मतारखेत तसेच विद्यार्थ्याचा फोटो, स्वाक्षरी इ. दुरुस्त्या असतील तर अशा दुरुस्त्या कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर करुन एक प्रत तातडीने या कार्यालयास सादर करावयाची आहे.

६) विद्यार्थ्याकडून प्रवेशपत्र (Hall Ticket ) गहाळ झाल्यास कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर पुन:श्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने द्वितीयप्रत (Duplicate ) असा शेरा देऊन प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.

७) प्रवेशपत्रावर (Hall Ticket ) विद्यार्थ्याचा चूकीचा फोटो असल्यास त्याजागी संबंधित विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून फोटोवर प्राचार्यानी शिक्का मारुन सही करावी.त्याची एक प्रत केंद्रसंचालक व एक प्रत माहितीसाठी या कार्यालयास सादर करावी.

८) फक्त ज्या विद्यार्थ्यांची हजेरी नियमानुसार भरत नाही विद्यार्थ्यांचे आवेदनवपत्रे रदद करण्याबाबतचे प्रस्ताव या कार्यालयाकडे मुदतीत सादर केली असतील अशाच विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे (Hall Ticket ) कोणत्याही परिस्थितीत संबंधित विद्यार्थ्यांस दिली जाणार नाहीत याची कनिष्ठ महाविद्यालयांनी दक्षता घ्यावयाची आहे.

विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत ( Hall Ticket ) वरीलप्रमाणे कार्यवाही करावी. त्यासंदर्भात काही तांत्रिक अडचण उदभवल्यास तातडीने या कार्यालयाशी संपर्क साधावा.

21/01/2020

विभागीय सचिव

कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.